


दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २२० • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.१६ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# कुंडमळा पूल दुर्घटना : वाहून गेलेल्यांचा युद्धपातळीवर शोध सुरू

## सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे (वृत्तसंस्था)**–पुण्यातील मावळमधील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्याची घटना रविवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास घडली आहे. २५-३० पर्यटक वाहून गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामध्ये अनेक लहान मुले आहेत. तर ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आमदार सुनील शेळके यांनी दिली आहे. या घटनेत प्राथमिक माहितीनुसार २ लोकांचा मृत्यू झाला असून, आतापर्यंत सहा जणांना वाचवण्यात आले, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत कुंडमळा येथील घटनेतील मृत आणि जखमी व्यक्तींबाबत माहिती दिली. ते म्हणाले, पुणे जिल्ह्यातील तळेगावनजीक इंदोरी येथे इंद्रायणी नदीवरील एक पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेचे वृत्त ऐकुन अतिशय दुःख झाले. या घटनेत प्राथमिक माहितीनुसार २ लोकांचा मृत्यू झाला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.या घटनेसंदर्भात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक आणि संबधित तहसीलदार यांच्याशी मी सातत्याने संपर्कात आहे. काही जण वाहून गेल्याने त्यांचा युद्धपातळीवर शोध घेतला जात आहे. घटनास्थळी एनडीआरएफला पाचरण करण्यात आले आहे. मदत कार्याला तातडीने वेग देण्यात आला आहे.६ जणांना आतापर्यंत वाचविण्यात यश आले आहे. सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ३२ लोक जखमी झाले, त्यापैकी ६ गंभीर आहेत. त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्वतः विभागीय आयुक्त घटनास्थळाकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.





### कुंडमळा येथे आठ कोटींचा पूल मंजूर

अजित पवार म्हणाले, कुंडमळा घटनेबाबत वेगवेगळी माहिती मिळत आहे. एनडीआरएफचे पथक घटनास्थळी गेलेले आहे. आजूबाजूच्या नगरपालिकेची पथके देखील तिथे दाखल झालेली आहे.प्रथमदर्शनी सांगण्यात येते की, तिथे असणारा लोखंडी पूल फार सडलेला होता. त्याठिकाणी जास्त लोक उभे राहिले. तसेच त्यावरून दुचाकी पण जात होत्या. ओव्हरवेट झाल्याने तो पूल कोसळला. त्या ठिकाणी आठ कोटींचा एक पूल आधीच मंजूर असल्याचे अजित पवार म्हणाले.या घटनेबाबत संपूर्ण माहिती देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत. काही काळात माहिती देतो, असे जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले असल्याचे अजित पवार म्हणाले.


# इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला

## २० ते २५ नागरिक वाहून गेल्याची भीती

## प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मोठी दुर्घटना

**मोहोळ । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली असून, सुमारे २० ते २५ नागरिक नदीत वाहून गेले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाळ्यातील पुराच्या प्रवाहामुळे आधीच कमकुवत झालेल्या पुलावर वाहतूक सुरू ठेवण्याचा प्रशासनाचा हलगर्जीपणा आज अनेक निष्पाप जीवांवर घात आला आहे.धोकादायक स्थितीत असलेल्या या पुलावरून दुचाकी व अन्य लहान वाहनांची वाहतूक सुरूच होती. गर्दी रोखण्यासाठी कुठलीही तातडीची उपाययोजना प्रशासनाकडून करण्यात आली नाही. जर योग्य वेळेत खबरदारी घेतली असती, तर या दुर्घटनेचा अनर्थ टाळता आला असता.



ही प्रशासकीय निष्काळजीपणाची चूक अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळवणारी ठरली आहे. जीवितहानीची भीती वर्तवली जात असली तरी अद्याप शोधमोहीम सुरू आहे. स्थानिक प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले असून शोधकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.या घटनेला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई व्हावी आणि भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी काटेकोर उपाययोजना केल्या जाव्यात, अशी नागरिकांची तीव्र मागणी आहे.

# मेसा गावात कृषिकन्यांच्या आगमनाने निर्माण झाला नवा उत्साह

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील मेसा गावात आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा येथील सातव्या सत्रातील कृषिकन्यांचे आगमन होताच गावात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील तीन महिने या कृषिकन्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, माती-पाणी परीक्षण, रोग-कीड नियंत्रण, बियाणांची प्रक्रिया, पिकांचे लागवड तंत्रज्ञान अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.या उपक्रमाच्या प्रारंभी ग्रामपंचायत व शेतकऱ्यांच्या वतीने कृषिकन्यांचे स्वागत करण्यात आले. सरपंच निलकंठ वरभे यांनी कृषिकन्यांना संबोधित करताना सांगितले की, या तरुण विद्यार्थिनींच्या मार्गदर्शनामुळे आमच्या शेतीच्या उत्पादनात निश्चितच वाढ होईल आणि नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यास मदत होईल.



या स्वागत सोहळ्यात कृषिकन्या प्रियंका सोनवाणे, अंजली तितीरमारे, प्रांजली सोनवाणे, दिशा सोनटक्के, संजीवनी शेंडे, आंचल पंचभाई व जान्हवी शर्मा यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. शेतकऱ्यांनीही पुढील तीन महिन्यांत कृषिकन्यांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नक प्रभारी डॉ. राम महाजन, कार्यक्रम समन्वयक राहुल तायडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. अश्विनी मानकर तसेच इतर विषयतज्ज्ञ उपस्थित होते.प्राचार्य डॉ. सुहास पोतदार यांनी सांगितले की, शिकताना शिकवणे हेच या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. कृषिकन्यांच्या ज्ञानाचा लाभ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतावर मिळणार आहे.गावातील महिला मंडळ, शालेय शिक्षक, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. शेतकऱ्यांनी कृषिकन्यांच्या उपस्थितीतून आपल्या शेतीतील समस्यांवर नवे उपाय शोधण्याची आशा व्यक्त केली आहे.या उपक्रमामुळे मेसा गाव कृषी क्षेत्रात प्रयोगशीलतेचा नवा आदर्श निर्माण करेल, असा विश्वास ग्रामस्थ व आयोजकांनी व्यक्त केला आहे. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील शेती क्षेत्राला शाश्वत विकासाची नवी दिशा मिळणार आहे.

# हिलांग याजिकचा सुवर्ण पराक्रम : अरुणाचल च्या कन्येने भारतासाठी इतिहास घडवला!

### थिंपूतील दक्षिण आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारताला सुवर्ण व रौप्य पदकांची कमाई

**मुंबई । विराम पवार**

उत्तरपूर्व भारतातील दुर्गम पर्वतरांगांतून झेप घेत अरुणाचल प्रदेशातील हिलांग याजिक हिने थेट आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्णाचे स्वप्न साकार केले आहे. भूतानची राजधानी थिंपू येथे नुकत्याच पार पडलेल्या १५व्या दक्षिण आशियाई बॉडीबिल्डिंग आणि फिजिक स्पोर्ट्स अजिंक्यपद स्पर्धेत तिने सुवर्ण आणि रौप्य अशा दोन पदकांची कमाई करून भारतासाठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदक पटकावणारी हिलांग ही अरुणाचलची पहिलीच महिला खेळाडू ठरली आहे. तिच्या या यशामुळे केवळ अरुणाचलच नव्हे, तर संपूर्ण देशभरातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अरुणाचल बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे अध्यक्ष नाबाम तूना यांनीही तिच्या अथक परिश्रमांचे विशेष कौतुक केले.

हे यश केवळ तिच्या मेहनतीचे प्रतीक नाही, तर भारताच्या कर्तृत्वाचे ते झळाळते प्रतीक आहे,असे ते म्हणाले.

हिलांग याजिकच्या यशाचा प्रवास सहज नव्हता. अरुणाचलसारख्या दुर्गम भागातील मर्यादित सुविधा, अपुरी साधनसामग्री आणि प्रशिक्षणाच्या कमी संधींवर मात करत तिने कठोर परिश्रम घेतले. तिच्या जिद्दीसमोर कोणतीही अडचण आडवी आली नाही. यामुळेच



ती आज देशाच्या मानचिन्हावर सुवर्ण अक्षरांनी नाव कोरू शकली.

दक्षिण आशियातील विविध देशांतील नामांकित स्पर्धकांमध्ये तिने आपल्या तंत्र, ताकद आणि आत्मविश्वासाच्या जोरावर बाजी मारली. भूतान बॉडीबिल्डिंग असोसिएशनच्या आयोजनाखाली, वर्ल्ड बॉडीबिल्डिंग अँड फिजिक स्पोर्ट्स फेडरेशन व एशियन बॉडीबिल्डिंग अँड फिजिक स्पोर्ट्स फेडरेशनच्या मान्यतेने ही स्पर्धा पार पडली.हिलांग याजिकचे हे यश उत्तरपूर्व भारतातील आणि संपूर्ण देशातील युवकांना बॉडीबिल्डिंग व फिजिक स्पोर्ट्समध्ये करिअर घडवण्यासाठी प्रेरणा देणारे ठरणार आहे, यात शंका नाही. आज तिच्या कुटुंबासह संपूर्ण अरुणाचलमध्ये आनंदाचे, अभिमानाचे आणि प्रेरणेचे वातावरण आहे.

# राज्यातील शेतकऱ्यांना मदत करताना सरकारच्या हाताला लकवा मारतो का?:वडेट्टीवार यांचा संतप्त सवाल

**नागपूर (वृत्तसंस्था)**–शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नासाठी प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू त्यांचे आंदोलन सुरू आहे. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झाली पाहिजे ही मागणी काँग्रेसची देखील आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढणाऱ्या बच्चू कडू यांना आमचा पाठिंबा आहे असे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.एकीकडे राज्यात लाखोचे कोटींचे प्रकल्प होत आहेत, मुंबईतील जमीन एका उद्योजकाला देण्यात येतात मग शेतकऱ्यांचे प्रश्न सरकारला दिसत नाही का? शेतकऱ्यांना मदत करताना सरकारच्या हाताला लकवा मारतो का? अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

शेतकरी कर्जमाफी याबाबत समिती नेमणार असे सरकार कडून सांगण्यात येत आहे. पण निवडणुकीत मात्र कर्जमाफी देऊ, शेतमालाला हमीभाव देऊ, बोनस देऊ अशी आश्वासन दिली होती. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फटका बसला आहे अस असताना शेतकऱ्यांना तात्काळ मदत केली पाहिजे. त्याऐवजी समिती नेमून सरकार पुन्हा एकदा धूळफेक करत आहे.समिती नेमण्यापेक्षा सरकारने कर्जमाफी करावी अशी मागणी विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केलेली आहे.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले तेव्हा शेतकरी कर्जमाफीचा निर्णय आघाडी सरकारने घेतला होता. नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना देखील दिलासा दिला होता. आता मात्र चुकीची धोरणे आणि खोटी आश्वासन यामुळे शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. सरकार शेतकरी आणि शेतमजूर यांना वाऱ्यावर सोडत आहे. सरकारने निवडणुकीत दिलेली आश्वासन पूर्ण करावी अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली.

# नीलेश सांबरे यांचा शिवसेनेत प्रवेश–कोकणातील राजकीय समीकरणांना नवा वेग, जनसेवेच्या कार्याला नवा आधार!

**बदलापूर । प्रतिनिधी**

राजकारणात कधी नव्या समीकरणांची उधळण होते, कधी नव्या नेतृत्वाची आकांक्षा आकार घेते. अशाच एका महत्त्वपूर्ण घडामोडीत जिजाऊ संस्थेचे संस्थापक आणि सामाजिक कार्यकर्ते नीलेश सांबरे यांनी शिवसेनेत प्रवेश करून कोकणातील राजकीय समीकरणांना नवे वळण दिले आहे. त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह झालेल्या या पक्षप्रवेशामुळे कोकणात शिवसेनेची ताकद निश्चितच बळकट होणार आहे.जिजाऊ संस्थेच्या माध्यमातून गेली १७ वर्षे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासासाठी झटणारे नीलेश सांबरे हे कोकणातील एक ओळखले जाणारे आणि लोकप्रिय नेतृत्व आहे. समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची जिद्द त्यांना राजकीय प्रवासाकडे घेऊन आली. स्थानिक पातळीवर त्यांच्या प्रभावाने अनेक निवडणुकांमध्येही ठसा उमटवला आहे.

मी ज्या भागातून आलो आहे, तिथे अजूनही शिक्षण आणि आरोग्य यांसाठी संघर्ष सुरू आहे. या कार्याला व्यापक व्याप्ती मिळावी यासाठी शिवसेनेचा मजबूत मंच आवश्यक होता. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास ठेवून हा निर्णय घेतला आहे.तसेच, त्यांच्या सोबत जिजाऊ संघटनेचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते देखील भगव्या शिवसेना पताकेखाली सहभागी झाले आहेत. हा प्रवेश केवळ राजकीय हलचाल नाही; तर ही समाजासाठी आणखी प्रभावीपणे काम करण्याची नवी संधी आहे,असे त्यांनी ठामपणे सांगितले.शिवसेना आणि जिजाऊ संघटनेचा डीएनए एकच आहे. समाज सुखी आणि आनंदी करणं हा आमचा अजेंडा आहे. आता धनुष्यबाणाची ताकद तुमच्या पाठीशी आहे, त्यामुळे भगवा सर्वत्र फडकवायचाच आहे.नीलेश सांबरे यांचा शिवसेनेत प्रवेश हा केवळ एक पक्षांतरण नसून कोकणातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आणि भविष्यातील राजकीय समीकरणांसाठी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार नरेश म्हस्के, शिवसेना सचिव राम रेपाळे तसेच कोकणातील जिजाऊ संघटनेचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कोलारी येथे सुसंस्कार शिबिरात शेकडो विद्यार्थ्यांना मिळाले सुसंस्कारांचे धडे

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील पावन भूमी कोलारी येथे श्री समर्थ एकनाथ महाराज संस्थानच्या प्रांगणात श्री गुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार समिती गुरुकुंज मोझरी, श्री गुरुदेव सेवा मंडळ कोलारी आणि श्री संत एकनाथ महाराज संस्थान कोलारी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्वर्गीय जगन्नाथजी गावंडे यांच्या प्रेरणेने व आचार्य हरिभाऊजी वेरुळकर गुरुजी व ह.भ.प. मनोज महाराज चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे यशस्वी आयोजन झाले.या शिबिरात कोलारीसह चिचाळा, मेंढेगाव, भुयार, वाकर्ला, तरोडी, मेढा, सिर्सी (नागपूर) आदी १५ गावांतील शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. देशाच्या भावी पिढीला सुसंस्कारित व स्वयंशिस्तीने युक्त करण्याच्या हेतूने २८ मे २०२५ पासून शिबिराची सुरुवात झाली.


दररोज पहाटे ५.३० वाजता सामुदायिक ध्यानाने दिनचर्या सुरू होत असे. त्यानंतर आदर्श जीवनशैली, आत्मसंरक्षण, योगासने, कराटे, लाठीकाठी, मल्लखांब, बौद्धिक सत्र, संगीत, श्र्लोक पाठांतर, श्रीमद् भगवद्गीता संथा, टाळ पदन्यास, वक्तृत्व कला अशा विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना सर्वांगीण संस्कार दिले जात होते. सायंकाळी सामुदायिक प्रार्थनेनंतर विद्यार्थ्यांना घरी परत पाठवले जाई.शिबिरात पालकांसह अनेक मान्यवरांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे उत्साहवर्धन केले. समारोप कार्यक्रमात 'गुरुदेव हमारा प्यारा' या संकल्प गीताने सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दयारामजी चौधरी होते. प्रमुख अतिथी म्हणून लक्ष्मण राऊत, सतीशजी वाजुरकर, बळीराम गावंडे, किशोर गावंडे, चिंतेश्वर चौधरी, देवराव थेरे, परसराम ठाकरे, संदिप इंगोले, सूर्यभान गावंडे, नामदेव गावंडे, राजेश्वर ठाकरे, प्रज्वला गावंडे, मोहन कडू, रोशन ढोक, भावना बावनकर, प्रिती दिडमुठे, कार्तिक गावंडे, सागर गावंडे यांची उपस्थिती लाभली.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी ऋषिकेश आमदरे, सूरज सोनटक्के, केतन वरघने, आनंद अलोने, राजु कडू, विशाल ठाकरे, संकेत गावंडे, रोशन गावंडे, प्रदीप अलोणे, चेतन अलोणे, सागर लाखापुरे, यश गावंडे, साक्षी सोनटक्के, अनुष्का कडू, वेदिका गावंडे व ग्रामस्थांनी मोलाचे योगदान दिले.



## सुवर्णपदकाचं सोनं की भ्रष्टाचाराचा डाग?

# वन विभागात सुवर्णपदकविजेत्या महिला आरएफओ स्नेहल अवसरमल यांचं निलंबन

## १ कोटी १३ लाख रुपयांची अनियमितता उघड





### सुवर्णपदकाचा अवमान – पुरस्कारांचा बाजार?

**सुवर्णपदक वाटताना जर प्रशासन एवढ्या लाचारीने वावरत असेल, तर इतर पदकांचा, पुरस्कारांचा सन्मान शिल्लक राहतो का ?हा प्रश्न आज संपूर्ण व्यवस्थेच्या प्रतिष्ठेवरच घणाघात करणारा आहे.**

**धुळे । उमाकांत अहिरराव**

नंदूरबार जिल्ह्यात नवापूर येथे कार्यरत असलेल्या प्रादेशिक वन अधिकारी (RFO) स्नेहल अवसरमल यांच्यावर ४५ लाखांहून अधिक गैरव्यवहार, कामातील निष्काळजीपणा आणि जबाबदारी टाळल्याचे गंभीर आरोप ठरले आणि त्यांना ३० मे २०२५ रोजी निलंबित करण्यात आले. विशेष म्हणजे, ह्याच अधिकाऱ्यांना अवघ्या काही आठवड्यांपूर्वी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान करण्यात आले होते.हा विरोधाभास केवळ सामान्य जनतेला नव्हे, तर प्रामाणिक प्रशासन व्यवस्था बाळगणाऱ्या प्रत्येक नागरिकाला चटका लावणारा आहे. सुवर्णपदक आणि निलंबनाच्या या विचित्र संगमाने संपूर्ण प्रशासकीय प्रक्रियेवरच मोठा प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

२०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीतील उत्कृष्ट सेवेसाठी अवसरमल यांची शिफारस झाली. पण शिफारसीच्या वेळीच त्यांच्या नावावर आधीपासून चौकशी सुरू होती, हे विशेष धक्कादायक. २४ फेब्रुवारी २०२५ रोजीच ३ सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली होती. तपासाअंती नवापूर प्रादेशिक कार्यालयातील २६.६१ लाख आणि मनरेगा योजनेंतर्गत १८.४६ लाख अशा एकूण ४५.१७ लाख रुपयांच्या अनियमितता स्पष्ट झाल्या. एकूण संपूर्ण प्रकरणात तब्बल १ कोटी १३ लाख रुपयांची अनियमितता असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जातो.अशा अधिकाऱ्यांचे नाव सुवर्णपदकासाठी पुढे जाते तरी कसे? निवड समितीने नेमकं काय पाहिलं? की डोळेझाक केली? एकीकडे आरोपांखालील अधिकारी पुरस्कारासाठी पात्र ठरतात आणि दुसरीकडे त्यांच्या गैरव्यवहारांची यादी दंड थोपटून वाढत जाते – हाच आजच्या व्यवस्थेचा सर्वात मोठा विडंबनात्मक पैलू आहे.

### वरिष्ठांचं मौन – अघोषित संरक्षण?

**या घडामोडीत फक्त स्नेहल अवसरमल यांच्यावर बोट ठेवून भागणार नाही. त्यांच्या शिफारशीला मूक संमती देणारे वरिष्ठ अधिकारी कोण? त्यांच्या कारभारावर देखरेख ठेवणाऱ्या यंत्रणा कुठे होत्या? असा प्रकार इतक्या सहज घडतो, म्हणजेच कुठे तरी आतूनच संरक्षण मिळतंय का? अशा प्रश्नांनीच आता वन खात्यातील प्रशासकीय शुद्धतेचीच शंका उपस्थित केली आहे.**

### निलंबन पुरेसं नाही; गुन्हा दाखल व्हावा

**निलंबन म्हणजे शिक्षा नसून चौकशीपूर्व टप्पा आहे. या प्रकरणाची सखोल न्यायालयीन चौकशी व्हावी आणि फौजदारी गुन्हा दाखल करून वसुलीची कठोर कारवाई व्हावी, हीच सामान्यांची, आणि आजही निष्ठेने सेवा करणाऱ्या अधिकाऱ्यांची अपेक्षा आहे.**

# झाडांची भिशी–पर्यावरणाशी घट्ट नातं जपणारा वाढदिवस!

## मनोज कामडी यांच्या सामाजिक बांधिलकीला हिरव्या उपक्रमाची साथ



**जितेंद्र मोरघा । जव्हार**

प्रत्येकाचा वाढदिवस म्हणजे केक, फुगे, हार–तुरे आणि चमकधमक. पण समाजात असे काही लोक आहेत जे आपल्या आनंदात समाजहिताचा आणि पर्यावरण रक्षणाचा वाटा शोधतात. असाच एक प्रेरणादायी उपक्रम पालघर जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते मनोज कामडी यांनी त्यांच्या ३९व्या वाढदिवसाच्या निमित्ताने सुरु केला आहे झाडांची भिशी!

मनोज कामडी हे आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्थानचे पालघर जिल्हा संघटक तसेच राजे यशवंत सार्वजनिक वाचनालयाचे कार्यवाह म्हणून कार्यरत आहेत. आपल्या वाढदिवसाला नेहमीपेक्षा काहीतरी वेगळं करायचं, असं ठरवत त्यांनी केक कापण्याऐवजी वृक्ष लागवडीचा संकल्प केला आणि त्या माध्यमातून झाडांची भिशी या नाविन्यपूर्ण उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली.

राजे यशवंत सार्वजनिक वाचनालयाच्या परिसरात विविध स्वदेशी वृक्षांची मान्यवरांच्या हस्ते लागवड करण्यात आली. यावेळी कोब्रा कमांडो मेजर रामदास भोगाडे, जेष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष विनायक शेळके, सचिव डॉ. शरद मुकणे, वाचनालय अध्यक्ष कमलजीत धानमेहेर, माजी नगरसेवक वैभव अभ्यंकर यांच्यासह अनेक मान्यवर व पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

या उपक्रमाची संकल्पना विनायक शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली साकार झाली आहे. यामध्ये पर्यावरणप्रेमींनी दरमहा २०० रुपये जमा करायचे असून त्या निधीतून झाडांची लागवड व त्यांचे संरक्षण केले जाईल. वाढदिवस, लग्नदिन किंवा कोणत्याही खास प्रसंगी प्रत्येकाने एक तरी झाड लावावे आणि त्याचे संगोपन करावे, असा संदेश या उपक्रमातून दिला जातो.

कार्यक्रमाच्या अखेरीस सर्वांनी पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली. हे केवळ एकदाच होणारे कार्यक्रम न राहता सातत्याने होत राहावे यासाठीही कटिबद्धता व्यक्त करण्यात आली.

निसर्गाशी असलेलं आपलं नातं जोपासणं, हेच खरं सामाजिक भान. माझा वाढदिवस मी भावी पिढ्यांना हिरवी भेट देण्यासाठी साजरा करतो आहे, असं मनोज कामडी यांनी आपल्या मनोगतात नमूद केलं.आजच्या प्रदूषित आणि धकाधकीच्या जीवनात, अशा संकल्पांची नितांत गरज आहे. कारण पर्यावरणाचं रक्षण हे केवळ सरकारचं नाही तर प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य आहे. झाडांची भिशी हा उपक्रम समाजात अशा सकारात्मक बदलांची चळवळ रुजवतो आहे.

## निलज ग्रामस्थांचे भीषण वास्तव

# पावसाच्या पत्र्यावरचं पाणीच जीवनाचा आधार!

### महाराष्ट्राच्या प्रगतिपथावरून दूर, करमाळ्यातील निलज गाव आजही पावसाच्या थेंबांवर जीवन जगते



**सोलापूर । प्रा. राजेश गायकवाड**

करमाळा तालुक्यातील निलज हे अवघ्या ५०० लोकसंख्येचे छोटेसे गाव. पण या छोट्याशा गावातील पिण्याच्या पाण्याची समस्या इतकी गंभीर आहे की, ती पाहून कोणाचंही मन हेलावून जाईल. शासकीय योजनांचे गाजर ऐकून नागरिक थकलेत; मात्र प्रत्यक्षात ना नळयोजना, ना टँकर सेवा आजही या गावातील लोक पावसाच्या पत्र्यावर साठवलेल्या पाण्यावर आपली तहान भागवतात.

ग्रामस्थांनी याआधी पोटेगाव येथून गाड्यांमध्ये ड्रम भरून पाणी आणण्याची व्यवस्था उभी केली होती. पण अलीकडील मुसळधार पावसामुळे सीना नदीला पूर आल्याने आणि पूल वाहून गेल्याने हा मार्गही बंद झाला आहे. त्यामुळे काही ग्रामस्थ पाण्याच्या शोधात बांधाऱ्यात उतरून धोकादायक प्रवास करत आहेत. जोरदार प्रवाहात चालताना केव्हा कोणाचा पाय घसरून तो व्यक्ती वाहून जाईल याची शाश्वती उरलेली नाही.

ही हृदयद्रावक परिस्थिती दै. सह्याद्रीचा राखणदार चे उपसंपादक प्रा. राजेश गायकवाड यांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली आणि सोशल मीडियावर प्रसारित केली. या व्हिडीओने राज्यभर खळबळ उडवली. अखेर तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला आणि तातडीच्या उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले.

तातडीने गावात आरओ प्लांट बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु हा तात्पुरता उपाय आहे. निलजसारख्या गावांना शाश्वत आणि दीर्घकालीन जलपुरवठा योजनेची गरज आहे. पावसाच्या हंगामात असा जीवघेणा संघर्ष करणाऱ्या गावांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची ही वेळ आहे.

या भीषण परिस्थितीवर शेतकरी संघर्ष समितीचे दशरथ अण्णा कांबळे यांनी आवाज उठवला आहे. त्यांनी प्रशासनाला दोन दिवसांची मुदत देत स्पष्ट इशारा दिला जर पाणी प्रश्न मार्गी लावला नाही, तर सोमवारपासून आम्ही बिडिओ कार्यालयात जाऊन आंदोलन छेडू.

सरकारच्या हर घर जल योजनेचे फलक लावले जातात, जलयुक्त शिवारच्या जाहिराती दाखवल्या जातात; पण प्रत्यक्षात निलजसारखी गावे अजूनही पावसाच्या थेंबांवर जगतात, हीच महाराष्ट्राच्या विकासाच्या गाजावाजाची दुसरी बाजू दाखवते.

# विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार–मुख्यमंत्री फडणवीस




**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची गरज आता कमी होणार असून, त्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न भारतातच पूर्ण होणार आहे, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत राज्य शासनाने पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत आशयपत्र (एलओआय) प्रदान केल्याने भारतातच जागतिक दर्जाचे शिक्षण घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई येथील हॉटेल ताजमध्ये पार पडलेल्या 'मुंबई रायझिंग : क्रिएटिंग अ इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय शिक्षण सचिव व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष विनित जोशी, अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, तसेच भारतातील विविध देशांचे कॉन्सुल जनरल आणि संबंधित



विद्यापीठांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले की, युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डीन (स्कॉटलंड), युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यु.के.), युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया), इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका), आणि इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली) ही जगातील नामांकित पाच विद्यापीठे भारतात आपले शैक्षणिक केंद्र स्थापन करीत आहेत. हे सर्व शैक्षणिक हब नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात उभारण्यात येणार असून त्यासोबतच मेडिसिटी, स्पोर्ट्स सिटी आणि इनोव्हेशन सिटीसारखी आधुनिक संकल्पना राबविण्यात येणार आहे.मुख्यमंत्री पुढे म्हणाले, मुंबईची ओळख सध्या आर्थिक, औद्योगिक आणि मनोरंजन उद्योग केंद्र म्हणून आहे. या विद्यापीठांच्या स्थापनेनंतर मुंबई 'एज्युकेशनल सिटी' म्हणून देखील ओळखली जाईल. २०४७ पर्यंत विकसित भारताच्या स्वप्नात हा टप्पा मोलाची भूमिका बजावेल.नवी मुंबईत विकसित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू आणि मजबूत पायाभूत सुविधा यामुळे आंतरराष्ट्रीय शिक्षण क्षेत्रातील गुंतवणूकदारांसाठी हे केंद्र आकर्षण ठरणार आहे, असेही त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशातील विद्यापीठे भारतात यायला उत्सुक झाली असून ज्या भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही, त्यांची ही स्वप्ने आता भारतातच पूर्ण होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी नुकत्याच झालेल्या वेस्टर्न युनिव्हर्सिटी आणि गोंडवाना विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य कराराचीही माहिती दिली.

# विजाभज आश्रमशाळेतील शिक्षकांच्या समस्यांबाबत सभा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**




विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा समस्या तुमच्या, पुढाकार आमचा या उपक्रमा अंतर्गत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय सरकार्यवाह तथा शिक्षक आमदार सुधाकरराव अडबाले यांच्या मार्गदर्शनाखाली तथा म. रा.मा.शि. महामंडळ मुंबई सहकार्यवाह जगदीश जुनगरी यांचे प्रमुख उपस्थितीत इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ सभा दि. १३ जून २०२५ रोजी इतर मागास बहुजन कल्याण विभाग चंद्रपूरच्या सहाय्यक संचालक श्रीमती आशा कवाडे यांचे कार्यालयात पार पडली. सभेकरिता प्रादेशिक उपसंचालक विजय वाकुलकर नागपूर हे सुद्धा उपस्थित होते.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा शासन निर्णय दिनांक ४ जून २०२५ नुसार विजाभज आश्रमशाळेतील पात्र शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती लाभ मंजूर करून सन २०२० पासून बंद असलेला प्रोत्साहन भत्ता वेतनात सुरू करून प्रलंबित थकबाकी तात्काळ अदा करण्यात यावी, या प्रमुख मागणीसह आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करणे, जिल्ह्याबाहेर झालेले प्राथमिक शिक्षकांचे समायोजन रद्द करून दिनांक १२ जुलै २०१९ च्या शासन परिपत्रकानुसार जिल्ह्यातच प्राथमिक/ माध्यमिक आश्रमशाळेतील रिक्त जागांवर करणे, प्रलंबित भ.नि.नि. / डिसीपीएस हिशोबचिठ्या तात्काळ वितरित करणे, कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय प्रतिपूर्ती, वरिष्ठ/ निवड श्रेणी, वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव, निवृत्ती वेतन प्रस्ताव सेवा हमी कायद्यानुसार ४५ दिवसांच्या आत मार्गी लावणे, जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तस्के अद्ययावत करून पडताळणी करून घेणे, माहे जानेवारी २५ पासून प्रलंबित १% घरभाडे भत्ता फरक तात्काळ अदा करणे, शासननिर्णय ३१ मे, २०२४ नुसार पुढील संचमान्यता करतांना सरल पोर्टलवरील आधार प्रमाणित विद्यार्थी ग्राह्य धरणे व खुल्या प्रवर्गातील शिक्षक रविंद्र ठमके यांचे आरक्षित जागेवर झालेले नियमबाह्य समायोजन तात्काळ रद्द करण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसह अनेक विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. बहुतांश उपस्थित समस्याग्रस्तांचे प्रस्ताव सभेच्या दिवशीच निकाली काढण्यात आले. सर्व प्रलंबित समस्या तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी सहाय्यक संचालकांना दिले आहे.सदर समस्या निवारण सभेकरिता विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, जिल्हा कार्यवाह दीपक धोपटे, महानगर कार्यवाह सुरेंद्र अडबाले, माजी कार्याध्यक्ष लक्ष्मणराव धोबे, उपाध्यक्ष आनंद चलाख, आश्रमशाळा विभागाचे जिल्हा कार्यवाह किशोर नगराळे, जिल्हाध्यक्ष दिनेश चौधरी, आदिवासी आश्रमशाळा जिल्हाध्यक्ष प्रमोद साळवे तथा संघटनेचे पदाधिकारी, केशवराव ठाकरे, पद्माकर वनकर, वसंत कोंडेकर, संतोष टोंगे, नवनाथ वरारकर, अनिल लांजेकर व इतर आश्रमशाळा पदाधिकारी, समस्याग्रस्त शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषीदुतांकडून 'शपथ या मातृभूमीची' चित्रपट प्रदर्शन; शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक जागरूकता

**वायफड । प्रतिनिधी**



बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी (वर्धा) येथील कृषीदूत विद्यार्थ्यांनी गावपातळीवर शेतकऱ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी सुरू केलेल्या ग्रामीण जागरूकता उपक्रमांतर्गत 'शपथ या मातृभूमीची' या शेतकरी आत्महत्येवर आधारित चित्रपटाचे खास प्रदर्शन करण्यात आले. गावातील मंदिराच्या प्रांगणात सायंकाळी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात गावकरी, युवक व लहान मुले मोठ्या उत्साहात सहभागी झाले.

या कार्यक्रमाद्वारे कृषीदुतांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत आत्महत्येसारख्या गंभीर विषयावर चर्चा घडवून आणली. चित्रपट पाहून तुम्हाला काय वाटले?, शेतकरी वर्गाला आपण काय सुचवाल? असे प्रश्न विचारून प्रेक्षकांमध्ये सकारात्मक विचारप्रवृत्ती निर्माण केली.या उपक्रमाला प्राचार्या डॉ. स्नेहल देशमुख, प्रा. राजेंद्र खरचे, समन्वयक डॉ. मंगेश घोडे, डॉ. कविता चोपडे, डॉ. राणी मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. याशिवाय शिक्षक विकास किरणापुरे व प्रशांत डोंगरे यांनी प्रत्यक्ष उपस्थिती देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.कार्यक्रमाचे आयोजन कृषिदुत आयुष सोमनाथे, रोहित वाघमोडे, कृष्णा वैद्य, ऋतिक विरुटकर, युगल रखुंडे, ज़हिर शेख़ व समीरण वानखेडे यांनी केले. कृषीदुत विविध विषयांवर शेतकऱ्यांना माहिती देत असून, खरीप हंगाम नियोजनासाठी गावपातळीवर प्रात्यक्षिकांद्वारे जनजागृती करत आहेत.

# धानोरा येथे जागतिक रक्तदाता दिन साजरा

## विद्यार्थिनींकडून जनजागृती आणि श्रद्धांजली

**धानोरा । प्रतिनिधी**



बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी - वर्धा येथील कृषी विद्यार्थिनींनी ग्रामीण लघुप्रकल्प अंतर्गत धानोरा येथे १४ जून २०२५ रोजी जागतिक रक्तदाता दिन साजरा केला. या निमित्त गावकऱ्यांमध्ये रक्तदानाविषयी जनजागृती करण्यात आली.

विद्यार्थिनींनी रक्तदानाचे महत्त्व, फायदे आणि रक्तगटाविषयी माहिती दिली. यासोबतच गावातील वाचनालयात लहान मुलांशी संवाद साधत पोस्टरच्या माध्यमातून रक्तदानाचे सामाजिक मूल्य सांगितले. कार्यक्रमात मायाताई वाटगोळे यांनी आपले विचार मांडले, तर जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक हनुमान सर यांनी विद्यार्थिनींचे मार्गदर्शन करून पाठबळ दिले.या प्रसंगी अहमदाबाद, गुजरात येथे नुकत्याच झालेल्या विमान अपघातातील मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विद्यार्थिनी आणि गावकऱ्यांनी मेणबत्त्या पेटवून दोन मिनिटे मौन पाळले.या उपक्रमात विद्यार्थिनी श्रेया जाधव, आस्था ढोकणे, श्रेया बहिरशेठ, समृद्धी काचोळे, नयन मानकर आणि स्नेहा मंडपकार यांचा सहभाग होता. कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम समन्वयक डॉ. राजेंद्र खर्चे, डॉ. कविता चोपडे, डॉ. मंगेश घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तर प्राचार्य डॉ. स्नेहल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.गावकऱ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# खड्ड्यात उतरून आंदोलन! रस्तादुरुस्तीच्या मागणीसाठी किरण ठाकरे चार तास बसले खड्ड्यात

**देवळी । प्रतिनिधी**




देवळी ते दिघी बोपापूर रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था, बससेवा बंद, पुलाचे अर्धवट काम आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष याला कंटाळून युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष किरण ठाकरे यांनी थेट रस्त्याच्या खड्ड्यात उतरून चक्काजाम आंदोलन छेडले. तब्बल चार तास खड्ड्यात बसून त्यांनी प्रशासनाला जागं केलं.

देवळी ते दिघी मार्गावरील रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून, त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, कामगार व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. बससेवा गेल्या तीन वर्षांपासून बंद आहे. नविन पुलाचे बांधकामही वर्षभरापासून रखडलेले आहे.

या समस्यांवर लक्ष वेधण्यासाठी आज सकाळी ९ वाजता सुरू झालेले आंदोलन दुपारी १ वाजेपर्यंत सुरू होते. किरण ठाकरे यांनी स्वतः रस्त्याच्या खड्ड्यात उतरून आंदोलनाचे नेतृत्व केले, तर सरपंच संदीप दिघीकर आणि ग्रामस्थांनी रास्ता रोको केला. अखेर सहाय्यक अभियंता खानविलकर यांनी घटनास्थळी येऊन रस्त्याच्या डागडुजीस आणि पुलाच्या कामाला तत्काळ सुरूवात करण्याचे आश्वासन दिले, त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.सरपंच संदीप दिघीकर, विनोद दांडडे, प्रविण कात्रे, स्वप्नील मदणकर, ज्योत्स्ना राऊत, राजेश इंगळे, हितेश दिघीकर, सुमित दिघीकर, गजानन कडूकार, घनश्याम कांबळे, विजय डवले, देवबाजी कुमरे, बाळु आडे, मंथन बावणे, चेतन इंगळे, पवन तिरकूळ, वैभव भोकरे, प्रेम धुर्वे आदींसह दिघी व बोपापूर गावचे असंख्य ग्रामस्थ आंदोलनात सहभागी झाले होते.या आंदोलनादरम्यान पोलीस उपनिरीक्षक अश्विन गजभिये आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी योग्य बंदोबस्त ठेवत शांतता राखली.

# पुणे विभागात ओमिक्रॉनचे नवे उपप्रकार सक्रिय सहव्याधी रुग्णांना धोका-उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे (वृत्तसंस्था)**-राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानभवन येथे आयोजित बैठकीत पुणे विभागातील कोविड-१९ साथीच्या अनुषंगाने आढावा घेतला. लक्षणे सौम्य असली तरी वृद्ध तसेच सहव्याधी असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक असून आरोग्य विभाग, महानगरपालिका तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड यांच्यासह दूरदृष्यप्रणालीद्वारे कोल्हापूर मनपा आयुक्त के. मंजुलक्ष्मी, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. कंदेवाड यांनी कोविड-१९ च्या अनुषंगाने सादरीकरण केले. सद्यस्थितीत तपासणीमध्ये ओमीक्रॉनचे जेएन, एक्सएफजी व जीएफ७-९ हे उपप्रकार आढळून येत आहेत. या प्रकारामुळे ताप, खोकला, घसा दुखणे असे सौम्य आजार होतात. फक्त रक्तशर्करा, कर्करोग आदी सहव्याधी कमी असलेले, रोग प्रतिकार शक्ती कमी असलेले नागरीक आदींना थोडा धोका जास्त आहे. अशांनी गर्दीत जाणे टाळावे. हात स्वच्छ धुणे, मास्क वापरणे तसेच सुरक्षित अंतर ठेवावे. श्वसनदाह वाढल्यास त्वरीत जवळच्या दवाखान्यात जाऊन तपासणी व इलाज करावा, असे यावेळी सांगण्यात आले.

# तुळजापूर रेल्वे स्थानकाच्या समस्या सोडवण्यासाठी २५ गावांच्या नागरिकांचे निवेदन



**तुळजापूर । प्रतिनिधी**

आज दिनांक १५ जून २०२५ रोजी तुळजापूर रेल्वे स्थानक परिसरातील २५ गावांच्या विविध समस्या आणि नागरिकांच्या मागण्या लक्षात घेऊन, गावकऱ्यांच्या वतीने संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे सीआरएस सेंट्रल डिव्हिजनचे सेफ्टी ऑफिसर मनोज अरोरा, नागपूर डिव्हिजनचे रेल्वे प्रबंधक डी.आर.एम. मनीष गर्ग, तसेच रेल्वे अधिकारी मनोज त्रिपाठी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून समस्या तात्काळ सोडवण्याची मागणी करण्यात आली.

या निवेदनात मुख्यतः अंडरफुलाजवळ सिमेंटच्या नाल्यांची व्यवस्था करून पाण्याचा निचरा करणे, अंडरपास परिसरात लाईट व्यवस्था, पक्का रस्ता व स्टेशनपर्यंत जाणारा मुख्य मार्ग तयार करणे, तसेच पादचारी पुलाचे (फुट ओव्हर ब्रिज) काम तातडीने सुरू करणे, अशा अनेक महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. याशिवाय जबलपूर एक्स्प्रेसचा थांबा तुळजापूरला द्यावा, रेल्वे ट्रॅकवर मालगाड्या स्थिर ठेवू नयेत, आणि चावरेच्या शेतापर्यंत उंच पूल बांधून मोठ्या वाहनांची वाहतूक सुलभ करावी, अशाही मागण्या समाविष्ट होत्या. तसेच, ब्रिजच्या कामासाठी अडथळा ठरत असलेल्या जमिनींचे तातडीने अधिग्रहण करण्याची विनंतीही करण्यात आली.

या निवेदनप्रसंगी तुळजापूर रेल्वे स्थानक कृती समितीचे अध्यक्ष रामकिशोर शिंगनधुपे, प्रणय शेंद्रे, अमोल पिठाले, सुनील तिवाडे, समीर आंबाडोळे, चांदोबा चहांदे, संजय पिसुडे, प्रफुल धाबर्डे, वैभव ताकसांडे, भीमराव नगराळे, सचिन महाबुधे, नाना कावळे, घनश्याम अतकरे, गणेश कोल्हे, प्रशांत नारायणे, योगेश राऊत, धम्मा शंभरकर, तुकाराम पोहटे, अजबराव धंदरे, गोपाल पोहटे, श्रीराम पाटील, बाळू महाबुधे, हरिभाऊ रोकडे, भगवान लाऊडघरे, नितीन लाऊडघरे, प्रदीप गुरूनुळे, समीर येसनकर यांच्यासह २५ गावांचे असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुबोध भरोसे यांची नौदलात सब लेफ्टनंट पदावर नियुक्ती; गुंजखेडा गावात उत्साहात अभिनंदन सोहळा

**गुंजखेडा । प्रतिनिधी**




गुंजखेडा येथील रहिवासी व भारतीय सेनेतील सेवानिवृत्त सुबेदार श्री. अवधूत भरोसे आणि सौ. सुनिता भरोसे यांचे द्वितीय सुपुत्र सुबोध भरोसे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या नौदल सब लेफ्टनंट अधिकाऱ्यांच्या परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशस्वी निवडीबद्दल गुंजखेडा ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात आदरणीय भंते चित्त ज्योती यांच्या वंदना व बाबासाहेब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार स्मरणाने झाली. त्यांनी समाज संघटन, शिक्षण आणि धर्मनिष्ठा याबाबत बाबासाहेबांनी दिलेल्या उपदेशाचा उल्लेख करत उपस्थितांना प्रबोधन केले.

प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. मिलिंद ठोंबरे यांनी सुबोध भरोसे यांचे अभिनंदन करत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी गावातील युवक-युवतींनी सुबोध याचा आदर्श घ्यावा, असेही सांगितले.कार्यक्रमात काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष प्रतापराव घांगळे यांनी पुष्पगुच्छ व पुष्पहार देत सत्कार केला. सुप्रसिद्ध कवी सोपान दातार यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून सुबोध भरोसे यांचे कौतुक केले.यावेळी माजी सरपंच कु. वहिदा शेख, सौ. वंदना शिंगणापूरे यांनी देखील पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. वर्धा केंद्रीय मानवाधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र डोंगरे यांनी शब्दसुमन अर्पण करत पुष्पहाराने गौरव केला.या कार्यक्रमाला आ. चंदू घांगळे, आ. दीपक खडसे, निलेश घांगळे, संजय घांगळे यांच्यासह गावातील अनेक मान्यवर नागरिक, महिला आणि युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुबोध भरोसे यांच्या या ऐतिहासिक यशामुळे संपूर्ण गुंजखेडा गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण पसरले आहे.

# पत्रकार सलमान आयशा फैय्याज खान 'अमरावती दर्पण' पुरस्काराने सन्मानित

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**



दहा वर्षांहून अधिक काळ सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील प्रश्नांना लेखणीच्या माध्यमातून न्याय देणाऱ्या आणि विशेषतः सर्वसामान्य व मुस्लिम समाजाच्या प्रश्नांना प्रभावीपणे मांडणाऱ्या विदर्भ टुडे न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार सलमान आयशा फैय्याज खान यांना 'अमरावती दर्पण' पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

अमरावती शहरातील श्याम चौक येथील जोशी हॉलमध्ये झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात, भारत सरकारचे राष्ट्रीय पुरस्कार विजेते डॉ. मनीष शोभा शंकरराव गवई आणि दैनिक मतदार राजचे संपादक विजय मनुताई किसनराव गायकवाड यांच्या हस्ते सलमान खान यांना सन्मानित करण्यात आले. विविध यूट्यूब माध्यमांतून पत्रकारितेची सुरुवात करून ते नॅशनल मीडिया पर्यंत पोहोचले. त्यांनी समाजातील समस्यांवर सखोल आणि अभ्यासपूर्ण रिपोर्टिंग करून अनेकांना न्याय मिळवून देण्यासाठी भूमिका बजावली आहे.धामणगाव रेल्वे शहरातील रहिवासी असलेले पत्रकार सलमान खान यांनी शासनाच्या योजनांची अंमलबजावणी, विकास कामांतील तफावत, आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर सातत्याने आवाज उठवला. इलेक्ट्रॉनिक मीडियातून त्यांनी केलेले लिखाण व रिपोर्टिंग जनजागृतीत मोलाचे ठरले आहे. याच कार्याची दखल घेऊन 'अमरावती दर्पण' पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

> **"२०१५ मध्ये यूट्यूब चॅनलद्वारे पत्रकारितेची सुरुवात केली. त्यानंतर विविध यूट्यूब चॅनल्स आणि २०२० पासून नॅशनल मीडियात काम करण्याची संधी मिळाली. आज 'अमरावती दर्पण' पुरस्कार मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. हा पुरस्कार मी माझ्या आई आयशा खान आणि वडील फैय्याज खान यांना समर्पित करतो.**
> **- सलमान आयशा फैय्याज खान, पुरस्कारप्राप्त पत्रकार**

## शिवूरमध्ये युवा कॉम्प्युटर अकॅडेमीचा बहुपर्यायी उपक्रम

# १००० वृक्षांचे वाटप, करिअर मार्गदर्शन व गुणवंतांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच सामाजिक भान जपणारा एक आगळा-वेगळा उपक्रम शिवूर येथील युवा कॉम्प्युटर अकॅडेमीच्या वतीने आयोजित करण्यात आला. या भव्य कार्यक्रमात १००० वृक्षांचे वाटप, करिअर मार्गदर्शन शिबिर, पालक व माजी विद्यार्थी मेळावा, MS-CIT व IT डिप्लोमा प्रमाणपत्र वितरण तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अशा विविध उपक्रमांचा उत्साही आणि प्रेरणादायी समारंभ पार पडला. मुख्य अतिथी म्हणून उपस्थित माजी शिक्षणाधिकारी मा. धोंडिरामसिंह राजपूत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, कोणतीही शाखा लहान किंवा मोठी नसते. शिक्षणात पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मुलांनी दररोज पालकांचे दर्शन घ्यावे आणि पालकांनीही शिक्षणात सक्रिय सहभाग घ्यावा. त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करत त्यांचे कौतुक केले. अकॅडेमीचे प्रमुख समाधान जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकात पालकांच्या योगदानाचा उल्लेख करत नम्रपणे सांगितले, आज मी जिथे आहे, त्यामागे





माझ्या पालकांचे संस्कार आहेत.महिला पालकांचाही विशेष सत्कार वृक्ष भेट देऊन संचालिका सरला जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. हा उपक्रम पालक-विद्यार्थी संबंध अधिक घट्ट करणारा ठरला. अनेक माजी विद्यार्थ्यांनी संस्थेविषयी आपले मनोगत व्यक्त करत सांगितले की,महाराष्ट्र शासनाच्या सारथीच्या उडचड डिप्लोमामुळे आम्हाला नोकरी मिळाली. आजही आम्ही शिकतोच आहोत माजी नव्हे, तर आजी विद्यार्थी आहोत! या शब्दांतून त्यांच्या शिकण्याची जिद्द आणि संस्थेबद्दलची कृतज्ञता दिसून आली. संत बहिणाबाई महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी चंद्रशेखर देशमुख यांनी आदर्श पालकांच्या सत्काराचे कौतुक करत सांगितले, या उपक्रमातून आम्हालाही नवी शिकवण मिळाली. आता आम्हीदेखील आमच्या महाविद्यालयीन कार्यक्रमात पालकांचा विशेष सन्मान करू. या कार्यक्रमात ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज माधाने, ह.भ.प. भोपळे महाराज, माजी जि.प. सदस्य सुनील दादा पैठाणपागरे, उपसरपंच नंदू बापू जाधव, सरपंच पती विजय जिंजूडे, बाबासाहेब राऊत, शिवाजी आण्णा जाधव, संजय जाधव सर, कैलास जाधव सर, मच्छिंद्र जाधव, अनिल भोसले, रामेश्वर साळुंके सर, सुशील देशमुख, आदर्श शाळा पोखरी चे काळे सर, अप्पासाहेब ठुबे, अरुण वरपे सर, विजय जाधव, नितिन जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या शेवटी आदर्श विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला आणि उपस्थितांनी अल्पोपहाराचा आनंद घेत कार्यक्रमाची सांगता झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे उपक्रम म्हणजे केवळ स्नेहमेळावे नव्हे, तर त्यांच्या आत्मविश्वासाला, करिअरला आणि समाजातील जबाबदाऱ्या समजून घेण्यास मदत करणारा एक प्रकाशस्तंभ ठरतो.

# जिल्ह्यात १६ ते २२ जून दरम्यान पीक कर्ज वाटप सप्ताह

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

खरीप हंगाम सुरू झाल्याने शेतकऱ्यांना पीक लागवडीसाठी आणि शेतीच्या विविध गरजांसाठी भांडवलाची मोठी आवश्यकता भासते. याच पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात १६ ते २२ जून दरम्यान पीक कर्ज वाटप सप्ताह आयोजित करण्यात येणार आहे.या कालावधीत जिल्ह्यातील सर्व बँक शाखांमध्ये विशेष मेळावे घेण्यात येणार असून शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजुरी व वितरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. यासाठी जिल्हा प्रशासनाने महसूल, कृषी, ग्रामविकास, सहकार व अन्य विभागांच्या अधिकाऱ्यांना नियोजनबद्ध कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

जिल्हाधिकारी गौडा यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत की, प्रत्येक बँक शाखेत दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत पीक कर्ज वाटप मेळावे आयोजित करावेत. यासाठी तहसीलदार, गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, बँक शाखा व्यवस्थापक, सहायक निबंधक, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था), तालुका पशुसंवर्धन अधिकारी, सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय आदी अधिकारी समन्वय साधून नियोजन करणार आहेत.तहसीलदारांनी महसूल, कृषी, ग्रामविकास आणि सहकार विभागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी, अशी सूचना देण्यात आली आहे. नोडल अधिकारी दररोज किमान ३ तास संबंधित बँक शाखेला भेट देऊन मेळ्याच्या कार्यवाहीवर देखरेख ठेवतील आणि १०० टक्के पात्र शेतकऱ्यांना कर्ज वितरण सुनिश्चित करतील.कर्ज वितरण मेळाव्यात शेतकऱ्यांना अर्ज प्रक्रिया, पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रांची माहिती, तसेच किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय आणि कुक्कुटपालन यासाठी मिळणाऱ्या खेळत्या



भांडवली कर्जाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय शेतकऱ्यांचे ग्रीस्टॅक पोर्टलवर फार्मर आयडी तयार करून देण्याचीही व्यवस्था राहणार आहे.

**कर्ज वितरणासाठी आवश्यक कागदपत्रे:**

**१. आधारकार्ड**
**२. पॅन कार्ड**
**३. दोन पासपोर्ट आकाराचे फोटो**
**४. बँक पासबुकची प्रत**
**५. ७/१२ उतारा**
**६. नमुना ८अ**
**७. कर्ज नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र**

प्रचारासाठी महसूल, ग्रामविकास, कृषी व सहकार विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना आवश्यक माहिती पोहोचवावी व त्यांना आवश्यक कागदपत्रांसह मेळाव्यास उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त करावे, असेही आदेश देण्यात आले आहेत.या मेळाव्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी. याशिवाय, प्रत्येक बँक शाखा व्यवस्थापकाने कर्ज वितरणाचा दैनंदिन अहवाल तहसीलदार व जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, चंद्रपूर यांच्याकडे सादर करावा, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# कपाशी लागवडीपूर्वी कृषीदूतांनी शत्रू कीडे व मित्र कीड याबाबत शेतकऱ्यांना केले सखोल मार्गदर्शन

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, आनंदवन, वरोरा येथील सातव्या सत्रातील कृषीदूत मागील काही दिवसांपासून आसाळा गावात प्रशिक्षणासाठी वास्तव्यास असून विविध कृषी उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य करत आहेत. या उपक्रमांत दुग्ध व्यवसाय, नैसर्गिक शेती, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व शाश्वत शेती यांचा समावेश आहे.

नुकत्याच राबविण्यात आलेल्या उपक्रमात कृषीदूतांनी कपाशीवरील शत्रू कीडे आणि मित्र कीड यासंबंधी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी कपाशीच्या उत्पादनावर परिणाम करणाऱ्या शत्रू किडींचे प्रकार, त्यांच्यामुळे होणारे नुकसान आणि त्यावर योग्य नियंत्रण उपाय सांगितले. त्याचबरोबर, मित्र किड्यांची ओळख करून देत, त्यांच्या उपस्थितीमुळे पिकास होणारे फायदे देखील समजावून दिले.

या मार्गदर्शन उपक्रमाला आसाळा गावातील ग्रामस्थ



पुरुष व महिला मंडळ यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेतकऱ्यांनी या ज्ञानसत्राचा लाभ घेत कपाशी लागवडीपूर्वी आवश्यक त्या उपाययोजना समजून घेतल्या.उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषीदूत राज दसोरा, गोपाळ मसलकर, अथर्व महल्ले, साहिल कंदुकवार, वैभव जनबंधू, शिवराज डुकरे आणि भूषण गानफाडे यांनी विशेष मेहनत घेतली. कीटकशास्त्र विभाग प्रमुख नितीन गजबे सर व डॉ. स्वाती लोनागरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना कपाशी उत्पादनात होणारे नुकसान कमी करणे आणि उत्पादनात वाढ करणे शक्य होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# जिल्हाधिका-यांकडून अन्न व औषध प्रशासन विभागाचा आढावा

## नियमित तपासणी करण्याच्या सुचना



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अन्न सुरक्षा मानदे कायदा - २००६ ची प्रभावी अंमलबजावणी, नियंत्रण व समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सल्लागार समितीचे गठण करण्यात आले आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी शुक्रवारी अन्न व औषध प्रशासन विभागाचा आढावा घेऊन नियमित तपासणी करण्याच्या सुचना दिल्या.जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण उमप, पोलिस उपअधिक्षक (गृह) योगेश्वर पारधी, उपसंचालक (कृषी) चंद्रकांत ठाकरे, जिल्हा उद्योग केंद्राचे पी.के. खरमाटे, शिक्षण विभागाच्या अर्चना मासीरकर, अन्न पदार्थ व्यावसायिक प्रतिनिधी प्रशांत चिटनुरवार आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, बाजारात विक्रीकरीता असणा-या अन्न पदार्थांमध्ये कोणत्याही भेसळ होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच दुकानांची / आस्थापनांची नियमित तपासणी करावी. भेसळ करणा-यांवर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करावी. बाजारातील अन्न पदार्थांबाबत ग्राहकांमध्ये जनजागृती करावी. सुगंधी गुटखा, प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक, साठवणूक व विक्री होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी दिल्या. यावेळी सहाय्यक आयुक्त श्री. उमप यांनी सादरीकरण केले.येथे करा तक्रार : याबाबत नागरिकांना तक्रार नोंदवायची असल्यास 'वंदे मातरम चांदा' टोल फ्री क्रमांक १८००-२३३-८६९१ तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचा टोल फ्री क्रमांक १८००-२२२-३६५, याशिवाय foscos.gov. in या संकेतस्थळावरील Food Consumer Grievance वर ऑनलाईन तक्रार नोंदविता येते.

# पुणेकरांसाठी वाहतूक नियंत्रणाचे नवे ॲप:नागरिक आता मोबाईलवरून करू शकणार समस्यांची नोंद

**पुणे (वृत्तसंस्था)**–पुणे शहरात प्रवास करणारे नागरिक आणि वाहतूक विभागात समन्वयासाठी, परिस्थितीनुसार दुहेरी संवाद राहण्यासाठी आणि नागरिकांना वाहन चालवताना संबंधित परिसरातील वाहतूकीची माहिती तात्काळ मिळण्याच्या दृष्टीने पुणे शहर पोलिस आयुक्तालयाने तयार केलेल्या 'पीटीपी ट्रॅफिकॉप प'चे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

विधान भवन येथे आयोजित एका बैठकीत झालेल्या लोकार्पण कार्यक्रमास विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या संकल्पनेतून हे प तयार करून घेण्यात आले आहे. यावेळी पुणे शहरच्या पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी या पबाबत माहितीचे चित्रफीतीद्वारे सादरीकरण केले.पुणेकरांना उद्भवणाऱ्या नागरी समस्यांमध्ये मुख्यतः वाहतूक कोंडी, त्यातून घडणारे अपघात आणि वाहतूकीमुळे निर्माण होणारे प्रदूषण आदी गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यास प्रामुख्याने वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांवर प्रभावी कारवाई न होणे, हे सुद्धा एक मुख्य कारण आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी पुणे पोलिसांनी नागरीकांना सक्षम करण्यासाठी व वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी सह पोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलिस आयुक्त पाटील, वाहतूक शाखेचे पोलिस उप आयुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली खासगी संगणक अभियंत्यांकडून हे प तयार करून घेण्यात आले आहे.या पमध्ये फुटपाथवर वाहन पार्किंग करणे, पदपथावरून वाहन चालविणे, जड वाहनांचे निर्बंधांचा भंग करणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणे, ट्रिपल सिट वाहन चालविणे, काळ्या फिल्मचा वापर, फॅन्सी नंबर प्लेट, विरूद्ध दिशेने नो एंन्ट्रीतुन वाहन चालविणे आदी प्रकारचे धोकादायक नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांची छायाचित्रे नागरीक या पवर अपलोड करू शकतील.या व्यतिरिक्त रिपोर्ट इन्सीडेन्टअंतर्गत वाहतूक कोंडीस कारणीभूत असणाऱ्या अपघात, वाहनात बिघाड, रस्त्यातील खड्डे, वाहतूक कोंडी, रस्त्यात तेल गळती, रस्त्यावर पाणी साचणे, रस्त्यावर झाड पडणे, रस्त्यात बेवारस असणारे वाहन आदी अडथळ्यांची माहिती नागरीक या पद्वारे वाहतूक पोलिस नियंत्रण कक्षास कळवू शकतात. वाहतूक नियमभंगाचा फोटो पाठविणाऱ्या किंवा तक्रार करणाऱ्या नागरिकांची गोपनीयता राखली जाणार आहे. गोपनीयता भंग होणार नाही, याची कटाक्षाने दक्षता घेण्यात येईल.वाहतूक नियमभंगाची माहिती अपलोड करताना नियमभंग करणाऱ्या वाहनाचे छायाचित्र किंवा चित्रफीत पोस्ट करावे. संबंधित वाहनाची नंबरप्लेट सुस्पष्ट दिसणे आवश्यक आहे. वाहतूक अडथळ्यांची माहिती अपलोड करताना वाहतूक अडथळयाचे छायाचित्र किंवा चित्रफीत पोस्ट करावे.

## पंढरीच्या दिशेने जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी चरणसेवा

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता विभागाचा उपक्रम ५ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची टीम सज्ज

**पंढरपूर (वृत्तसंस्था)**–पंढरपूला जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे 'चरणसेवा' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. राज्यातील नाशिक, जालना, सातारा, सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यांमधून निघणाऱ्या पालख्यांमध्ये सहाभगी होणाऱ्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, उपचार आणि चरणसेवा करण्यासाठी जवळपास ५ हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची टीम तैनात करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात आषाढी वारीला खूप महत्त्व आहे तसेच या वारीला एक परंपरा आहे, जी आजही जोपासली जाते. महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातून भाविक तसेच वारकरी मंडळी भक्तिभावाने पंढरीच्या दिशेने चालत निघतात. पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष सज्ज करण्यात आला आहे. त्यांच्याद्वारे चरणसेवा उपक्रम राबवला जात आहे.चरणसेवा या उपक्रमाच्या माध्यमातून पायी चालून थकलेल्या वारकऱ्यांच्या पायांना शास्त्रोक्त पद्धतीने व फिजिओथेरपीच्या मदतीने पायांवर उपचार केले जाणार आहेत. पायी चालताना अनेकदा वारकऱ्यांच्या पायांना सूज येते तसेच तळपायालाही वेदना होतात, यावर तत्काळ उपचार मिळावेत यासाठी आरोग्य पथक तैनात करण्यात आले आहे.वारकऱ्यांच्या या दिंडीसाठी एकूण ४३ ठिकाणी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. या मुक्कामाच्या ठिकाणी चरणसेवा दिली जात आहे. या ठिकाणी वैद्यकीय तपासणी कक्ष देखील स्थापन करण्यात आले आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .